जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे
नविन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे ४११००१
परिपत्रक क्र. भूमापन ४/ई.ऑ.नं. १५८४६३८/२०२५
दिनांक : ०४/०४/२०२५

---

वाचा:
१. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एल आर १०० / ५६८/ल-३/७८, दिनांक ०३/०७/१९७८.
२. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एल आर १००/८५/स-१ दिनांक ०१/०२/१९७९.
३. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एल आर २२७/ सी आर ३९२६/ल-२, दिनांक ०४/०२/१९९९.
४. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एल आर २२७/सी आर ३९२६/भू-३/९९, दिनांक २६/०३/१९९९.
५. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एल आर १००/सी आर ४०१०/भू-३/२००१, दिनांक ०४/०६/२००१.
६. या कार्यालयाकडील आदेश क्र. भूमापन-२/मो. फी दर व संवर्ग सुधारणा/प्र. क्र. २२१/२०२३, दिनांक ११/१०/२०२४.
७. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. भूमापन २/ई.ऑ.नं. १२८२३४३/२०२५, दिनांक २८/०२/२०२५.

---

महाराष्ट्र राज्यात भूमि अभिलेख विभागामार्फत जमीन धारकांच्या अर्जावरुन मोजणीची कार्यवाही करण्यात येते. मोजणी अर्जदार, सहधारक किंवा लगत धारक यांना भूकरमापक / परिरक्षण भूमापक या कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेला मोजणी निर्णय मान्य नसल्यास उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांचेकडे निमताना मोजणी अर्ज करण्याची तरतूद आहे. सदरची निमताना मोजणीची कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ मधील तरतूदीनुसार करणेबाबत, शासन व या कार्यालयाचे स्तरावरुन वेळोवेळी परिपत्रके व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. इकडील कार्यालयाकडील वाचा क्र. ४, दि. २६/०३/१९९९ च्या परिपत्रकामध्ये हद्द कायम मोजणीच्या कार्यपध्दतीबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यामधील मुद्दा क्र. २.१ नुसार भूकरमापकाने केलेल्या मोजणी कामाची तांत्रिक बाबींची कार्यालयात पडताळणी मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार यांनी करणेची असून, त्यानुसार “अ” आलेख व “क” प्रतिवर मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार यांनीच सही करणेची आहे. मोजणी कामाच्या तांत्रिक बाबींच्या पडताळणीस मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार हेच जबाबदार राहतील. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी जमिन धारकांचे मोजणी अर्जावर कार्यवाही झाल्याचे व नकाशा “क” प्रत जोडल्याबद्दलचे अर्जदारांना पाठविणेच्या पत्रावर सही करावी.” अशा सुचना दिलेल्या आहेत. भूकरमापक / परिरक्षण भूमापक यांनी दिलेल्या मोजणी निर्णयाचे “अ” आलेखावर उपअधीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्यास त्यांचे स्तरावरील प्रथम मोजणी अपील / निमताना मोजणी अपील संधी निरुपयोगी /व्यपगत ठरते. त्यामुळे भूकरमापक यांनी दिलेल्या मोजणी निर्णयाचे “अ” व “क” आलेखावर मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार यांनी सही करणे बाबतचे सूचना दि. २२/३/१९९९ चे परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. भूकरमापक/ परिरक्षण भूमापक यांनी दिलेल्या मोजणी निर्णयाचे “अ” आलेखावर उपअधीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यामुळे प्रथम अपील अर्ज / निमताना अर्ज स्वीकारण्यास उपअधीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी हे सक्षम प्राधिकारी ठरतात ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे भूकरमापक/ परिरक्षण भूमापक यांनी केलेल्या मोजणी निर्णयावर प्रथम अपील प्राधिकारी उपअधीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी आणि द्वितीय अपील प्राधिकारी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख ठरतात हे स्पष्ट होते.

वरील वाचा मधील नमुद परिपत्रकांतील तरतुदी कायम ठेवून निमताना व उच्च निमताना मोजणी कार्यवाहीबाबत स्वयंस्पष्ट सूचना देणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे निर्देश पारीत करण्यात येत आहे.

१. यापुढे निमताना यास **"प्रथम मोजणी अपील"** आणि उच्च निमताना यास **"द्वितीय मोजणी अपील"**असे संबोधण्यात यावे.

२. प्रथम मोजणी अपील / द्वितीय मोजणी अपील अर्ज प्राप्त झाल्यास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ मधील कलम २४७ मधील तरतूदीप्रमाणे उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी आणि जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी कार्यपध्दती अवलंबणे आवश्यक आहे.

३. भूकरमापक /परिरक्षण भूमापक यांनी दिलेल्या मोजणी निर्णयावर मोजणी अर्जदार, सहधारक किंवा लगत धारक यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ मधील तरतूदीनुसार उपअधीक्षक भूमि अभिलेख /नगर भूमापन अधिकारी यांचेकडे प्रथम मोजणी अपील अर्ज करावा.

४. संबंधित उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी प्रथम मोजणी अपील अर्जाबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे प्रकरण १३ "अपील, पुर्नरिक्षण व पुर्नविलोकन" या प्रकरणातील तरतूदीनुसार सुनावणी घेऊन अपील प्रकिया पुर्ण करुन आदेश पारीत करावेत व संबंधित आदेशात भूकरमापक / परिरक्षण भूमापक या कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या मोजणी निर्णयाबाबत परिशिष्ट "अ" मधील प्राथमिक पडताळणी सूची नुसार व अपील सुनावणी प्रक्रिये दरम्यान युक्तीवाद व पुरावे यांचे आधारे पडताळणी करुन गुणवत्तेवर आदेश पारीत करावेत. प्रथम मोजणी अपील फी भरणेबाबत पारीत केलेले आदेश हे प्रशासकीय आदेश असल्याने अपील पात्र राहणार नाहीत. परंतु त्यामध्ये मोजणीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर पारीत केलेले आदेश हे अपील पात्र राहतील.

५. उपअधीक्षक भूमि अभिलेख /नगर भूमापन अधिकारी यांनी केलेली प्रथम अपील मोजणी मान्य नसल्यास अर्जदार, सहधारक किंवा लगत धारक यांनी त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ मधील तरतूदीनुसार जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे द्वितीय मोजणी अपील अर्ज करावा.

६. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी द्वितीय मोजणी अपील अर्जाबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे प्रकरण १३ "अपील, पुर्नरिक्षण व पुर्नविलोकन" या प्रकरणातील तरतूदीनुसार सुनावणी घेऊन अपील प्रकिया पुर्ण करुन आदेश पारीत करावेत व संबंधित आदेशात उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी या कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या मोजणी निर्णयाबाबत परिशिष्ट "ब" मधील प्राथमिक पडताळणी सूची नुसार व अपील सुनावणी प्रक्रिये दरम्यान युक्तीवाद व पुरावे यांचे आधारे पडताळणी करुन गुणवत्तेवर आदेश पारीत करावेत व त्यानंतर द्वितीय मोजणी अपील प्रकरणी मोजणी फी भरणेबाबत स्वयंस्पष्ट आदेश द्यावेत व इकडील कार्यालयाकडील प्रचलित परिपत्रकातील तरतूदीप्रमाणे मोजणी फी भरून घ्यावी.

७. भूकरमापक / परिरक्षण भूमापक यांचे मोजणी निर्णयावर उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांचेकडून प्रथम मोजणी अपील अर्ज प्रकरणी निर्णय झाल्याखेरीज जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी मोजणी अपील अर्ज स्विकारु नये.

८. वाचा क्र. १ दि. ०३/०७/१९७८ चे परिपत्रकात नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ (१) नुसार कोणत्याही परिस्थितीमध्ये अपीलांची संख्या दोनपेक्षा जास्त होणार नाही अशी तरतूद असल्याने उपसंचालक भूमि अभिलेख यांना जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचे द्वितीय मोजणी निर्णयावर पुन्हा उच्च तपासणी / पुनरिक्षण करता येणार नाही.

९. प्रथम मोजणी अपील / द्वितीय मोजणी अपील मोजणी प्रकरणी संबंधित अधिकारी यांनी अर्जदार यांनी मुळ मोजणी फी ज्या सवंर्गामध्ये भरणा केली असेल त्या सवंर्गासाठी लागू असलेल्या कालावधीत प्रथम मोजणी अपील / द्वितीय मोजणी अपील अर्ज, सुनावणी व मोजणी प्रक्रियेसह अंतिम निकाली करणेचा आहे.

१०. पोटहिस्सा प्रकारातील मोजणी प्रकरणी या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. भूमापन-२/ई.ऑ.नं. १२८२३४३/२०२५ दिनांक २८/०२/२०२५ मधील सुचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

११. कोर्ट कमिशन व कोर्टवाटप मोजणी प्रकरणी न्यायालयाकडील आदेशाशिवाय प्रथम मोजणी अपील / द्वितीय मोजणी अपील अर्ज स्विकारण्यात येवू नये.

१२. सक्षम अपील प्राधिकरणाकडे अपीलाधीन असलेल्या विवक्षित मोजणी निर्णयाशी संबंधित मिळकतीच्या मोजणीसाठी संबंधितांनी मूळ कार्यालयाकडे (उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी) अपील कार्यवाही प्रलंबित असताना अर्ज सादर केलेचे निदर्शनास आल्यास संबंधित अपील प्राधिकरणाने अशा मोजणी कार्यवाहीबाबत स्वयंस्पष्ट आदेश अपील कार्यवाही दरम्यान पारीत करावेत.

१३. भूकरमापक / परिरक्षण भूमापक या कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या मोजणी प्रकिया / कार्यवाही बाबत किंवा निर्णयावर तक्रार प्राप्त झाल्यास सदर अर्ज हा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५७(२) मधील तरतूदीनुसार हितसंबंधितांना सुनावणीची संधी देऊन स्वयंस्पष्ट कारणासह संबंधित मोजणीबाबत आदेश पारीत करावेत.

१४. भूकरमापक / परिरक्षण भूमापक यांनी दिलेल्या सर्व प्रकारच्या मोजणी निर्णयावर सदरचे परिपत्रक लागू राहील.

१५. अधिनस्त क्षेत्रीय अधिकारी यांनी या कार्यालयाचे पुर्व मान्यतेशिवाय संविधानिक व अर्धन्यायिक बाबी संबंधी कोणत्याही सूचना / निर्देश पारीत करु नयेत. यापूर्वी या कार्यालयाचे पुर्व मान्यतेशिवाय संविधानिक व अर्धन्यायिक बाबी संबंधी कोणत्याही सूचना / निर्देश पारीत केलेल्या असल्यास त्या रद्द समजण्यात यावेत.

वरील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसे न केल्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये कारवाई केली जाईल.

या परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरीत करावी.

५/४/२५

डॉ. सुहास दिवसे (भा.प्र.से.)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे

प्रत :

१. मा. अप्पर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. सर्व विभागीय आयुक्त यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३. सर्व जिल्हाधिकारी तथा पदसिध्द उपसंचालक भूमि अभिलेख यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
४. सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
५. सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६. सर्व उपअधीक्षक भूमि अभिलेख यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.
७. सर्व कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त कार्यालय यांना माहितीस्तव.
८. परिपत्रक धारीका.

<u>परिशिष्ट "अ"</u>

**उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांचेकडे प्राप्त प्रथम मोजणी अपील प्रकरणी प्राथमिक पडताळणी सूची.**

१. मुळ मोजणी अर्ज प्रकरणी –

- मुळ अर्ज भरताना अर्जदार व सर्व सहधारक व लगत धारक यांची नांवे व पत्ते योग्य रितीने भरले आहेत काय? (होय / नाही)
- अर्जदार व सर्व सहधारक व लगत धारक यांना विहीत मुदतीच्या नोटीसीने मोजणी तारखेबाबत कळविलेले आहे काय? (होय / नाही)

  मोजणी नोटीसा पाठविल्याचा दिनांक -

  मोजणी नोटीसा रुजू केल्याचा दिनांक -
- मोजणी प्रकरणी मोजणी तारखेची विहीत मुदतीच्या नोटीसा रुजू केल्याबाबतची पोहोच प्रकरणी सामील केली आहे काय? (होय / नाही)
- नेमलेल्या तारखेस मोजणी करण्यात आली आहे काय? (होय / नाही)

  त्याबाबतचा पुरावा -
- मोजणीवेळी हजर अर्जदार, सहधारक व लगत धारक यांचे जबाब व पंचनामे प्रकरणी सामील आहेत काय? (होय / नाही)

२. मोजणी नकाशावर वहिवाट दर्शविताना या कार्यालयाकडील दिनांक २८/०२/२००७ च्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर असलेले बांध, तारेचे कुंपण, जुने कायम दगड, दगडाची भिंत, पिकाखालील क्षेत्र इ. हद्दीच्या खुणा दर्शविल्या आहेत काय? (होय / नाही)

३. मोजणी प्रकरण निकाली करताना मोजणी आज्ञावलीमध्ये आवश्यक नोंदी नियमानुसार करुन "क" प्रत निर्गमित करण्यात आली आहे काय? (होय / नाही)

स्वाक्षरी
उपअधीक्षक भूमि अभिलेख /
नगर भूमापन अधिकारी

<u>**परिशिष्ट "ब"**</u>

**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे प्राप्त द्वितीय मोजणी अपील प्रकरणी प्राथमिक पडताळणी सूची.**

१. प्रथम मोजणी अपील प्रक्रियेबाबत—

अ) उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी प्रथम मोजणी अपील पूर्व रितसर सुनावणी प्रकिया अवलंबिली आहे काय? (होय / नाही)

ब) उपअधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी प्रथम मोजणी अपील पूर्व सुनावणी अंती गुणवत्तेवर मोजणी फी भरणेबाबत निर्णय पारीत केलेला आहे काय? (होय / नाही)

२. प्रथम मोजणी अपील मोजणी प्रक्रियेबाबत -

- प्रथम मोजणी अपील अर्ज भरताना अर्जदार व सर्व सहधारक व लगत धारक यांची नांवे व पत्ते योग्य रितीने भरले आहेत काय? (होय / नाही)
- अर्जदार व सर्व सहधारक व लगत धारक यांना विहीत मुदतीच्या नोटीसीने मोजणी तारखेबाबत कळविलेले आहे काय? (होय / नाही)

  मोजणी नोटीसा पाठविल्याचा दिनांक -

  मोजणी नोटीसा रुजू केल्याचा दिनांक -
- मोजणी प्रकरणी मोजणी तारखेची विहीत मुदतीच्या नोटीसा रुजू केल्याबाबतची पोहोच प्रकरणी सामील केली आहे काय? (होय / नाही)
- नेमलेल्या तारखेस मोजणी करण्यात आली आहे काय? (होय / नाही)

  त्याबाबतचा पुरावा -
- मोजणीवेळी हजर अर्जदार, सहधारक व लगत धारक यांचे जबाब व पंचनामे प्रकरणी सामील आहेत काय? (होय / नाही)

३. मोजणी नकाशावर वहिवाट दर्शविताना या कार्यालयाकडील दिनांक २८/०२/२००७ च्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर असलेले बांध, तारेचे कुंपण, जुने कायम दगड, दगडाची भिंत, पिकाखालील क्षेत्र इ. हद्दीच्या खुणा दर्शविल्या आहेत काय? (होय / नाही)

४. मोजणी प्रकरण निकाली करताना मोजणी आज्ञावलीमध्ये आवश्यक नोंदी नियमानुसार करुन "क" प्रत निर्गमित करण्यात आली आहे काय? (होय / नाही)

स्वाक्षरी

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख